दैंनिक
# लोकांकीत
सत्याच्या बरोबर बातमीच्या पुढे जाणारे वृत्तपत्र
मुख्य संपादक-संजय पवार

### महापुरुषांकडे जातीतून पाहू नका

**मुंबई**–मुंबईतील शिवाजी पार्क येथे आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा गुढीपाडवा मेळावा पार पडला. यावेळी राज ठाकरे यांनी महाराष्ट्र नेक्स्ट नावाची एक वेबसाईट महाराष्ट्राला अर्पण केली. या वेबसाईटमधून सामान्य जनता आपले विचार मांडू शकतात. तसेच त्यांचे विचार सरकारपर्यंत पोहोचवण्याचे काम केले जाणार असल्याचे ठाकरेंनी स्पष्ट केले.यावेळी बोलताना राज ठाकरे यांनी अनेक मराठी लोकांची नावे सांगितली, ज्यांनी महाराष्ट्राचे नाव मोठे केले. तसेच महाराष्ट्रातील अनेक मुले बेपत्ता होत असल्याची आकडेवारी देखील त्यांनी जाहीर केली.

• (महाराष्ट्र) • वर्ष ९ वे • RNI : MAHMAR/2017/74482 • शुक्रवार दि.२० मार्च २०२६ • अंक-६८ • दैनिक • पाने ४ • पान १ • किंमत २ रु.

# इराण प्रश्नी भारताने ठाम भूमिका घ्यायला हवी होती; राज ठाकरेंचे वक्तव्य

**मुंबई (वृत्तसंस्था)**

इराणने दीर्घकाळ भारताला साथ दिली. आता त्या देशावर हल्ले होत असताना भारतानेही ठामपणे पाठिंबा द्यायला हवा होता. इराणकडून भारताला रुपयांमध्ये तेल मिळते, जम्मू-काश्मीरच्या मुद्द्यावरही त्या देशाने भारताला पाठिंबा दिला होता; मात्र अडचणीच्या काळात भारताने स्पष्ट भूमिका घेतली नाही, याचे परिणाम भविष्यात भोगावे लागतील असे मत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी गुरुवारी व्यक्त केले.दादर येथील शिवाजी पार्क मैदानात आयोजित मनसेच्या गुढीपाडवा मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी बाळा नांदगावकर, संदीप देशपांडे यांच्यासह मनसेचे पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. राज ठाकरे म्हणाले, देशात नेमके काय सुरू आहे याचीच लोकांना जाणीव राहिलेली नाही. समाज माध्यमांमध्ये आणि करमणुकीत लोकांना गुंतवून ठेवले जात आहे. 'मी काय बोलतो यापेक्षा तुम्ही त्यातून काय घेतात हे महत्त्वाचे आहे,' असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना सोशल मीडियाच्या प्रभावातून बाहेर पडण्याचे आवाहन केले.

निवडणुका येत-जात राहतात. मात्र आपण महाराष्ट्राच्या पुनरुत्थानासाठी उभे आहोत, असे स्पष्ट करत ठाकरे यांनी 'महाराष्ट्राचे हरवलेले वैभव परत मिळवण्यासाठी सत्ता आपल्या हाती घेणारच,' असा निर्धार यावेळी व्यक्त केला. राज्याच्या आर्थिक स्थितीवर भाष्य करताना त्यांनी सांगितले की, महाराष्ट्रावर सध्या सुमारे ११ लाख कोटींचे कर्ज आहे. पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असताना हे कर्ज सुमारे २ लाख कोटी होते; त्यानंतर सत्तांतर झाले आणि आजची स्थिती समोर आहे. शहरांतील वाहतूक कोंडी, खराब रस्ते आणि नागरी सुविधांची ढासळलेली अवस्था कधी सुधारणार सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारू नयेत म्हणून समाजाला मोबाइल आणि करमणुकीत गुंतवले जाते. माध्यमांनाही दबावाखाली ठेवले जाते, असा आरोप देखील राज ठाकरे यांनी केला.





**ठाणे : दिवा शहरात पुणे जिल्हा रहिवासी संघ आयोजित गुढीपाडव्यानिमित्त शोभायात्रा आयोजित करण्यात आली होती. मराठी अस्मितेचा पहिला दिवस व सण म्हणजे गुढीपाडवा असून त्यानिमित्ताने दिवा शहरात भव्य शोभयात्रा मोठ्या थाटामाटात व आनंदात काढण्यात आली. प्रसंगी दिवा शहरात राहणारे पुणे जिल्हा रहिवासी मंडळाचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते तर अनेक मान्यवर, बालगोपाल व महिलावर्ग सहभागी झाले होते. मराठी संस्कृतीची ओळख असणाऱ्या थोर पराक्रमी राजे व महापुरुषांच्या वेशभूषा परिधान करून शोभायात्रेत सहभागी झाले होते ( फोटो – संतोष पडवळ )**

# सुनेत्रा पवारांविरोधात काँग्रेसचे पदाधिकारी मैदानात

**बारामती । प्रतिनिधी**

बारामतीसह राज्यातील दोन जागांवरील विधानसभेच्या पोटनिवडणुकांबाबत महाविकास आघाडीत अद्याप अंतिम निर्णय झालेला नसल्याचे स्पष्ट झाले आहे. या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे विधिमंडळ पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी महत्त्वाचे विधान करत, शरद पवार गटाने निवडणूक लढवली नाही तर काँग्रेस त्या जागांवर उमेदवार देण्याचा विचार करेल, असे सांगितले आहे. बारामती पोटनिवडणुकीबाबत सुप्रिया सुळे यांनी घेतलेल्या न लढण्याच्या भूमिकेशी काँग्रेस सहमत नसल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. या मुद्द्यावर महाविकास आघाडीत अधिकृत चर्चा अद्याप झालेली नसून, परस्पर चर्चेनंतरच अंतिम निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी बारामतीत निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवली आहे. तुतारीवर उमेदवार दिला नाही, तर आम्ही उमेदवार देऊ, असा थेट इशारा त्यांनी दिला आहे. बारामतीत राष्ट्रवादीमुळे काँग्रेस वाढली नाही, अशी नाराजीही उघडपणे व्यक्त करण्यात आली. यासोबतच राष्ट्रवादी काँग्रेसने अनेक वेळा युती करून काँग्रेसला अडचणीत टाकल्याचा आरोपही करण्यात आला आहे. सुप्रिया सुळे आणि शरद पवार यांच्या भूमिकेवर टीका करतानाच भाजपवरही निशाणा साधण्यात आला. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी निवडणूक लढवणार असल्याचा दावा काँग्रेसकडून करण्यात आला आहे.

# गुढी पाडव्यानिमित्त डोंबिवलीतील नववर्ष स्वागत यात्रेचे आकर्षण ठरले ते नेहरू मैदानात उभारलेली महाकाय दीडशे फुटांची गुढी

## विशाल हिंदुत्व आणि भव्य सांस्कृतिक सोहळ्याचे प्रतीक म्हणून ही महाकाय गुढी डौलाने उभारली आहे–रविंद्र चव्हाण

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

हिंदू संस्कृतीच्या नव्या वर्षाची सुरुवात मंगलमय व्हावी आणि तरुण पिढीला आपल्या भारतीय संस्कृतीशी नाते टिकवून ठेवावे या उद्देशाने ही संकल्पना सांस्कृतिक डोंबिवलीत शहरातून श्री गणेश मंदिर संस्थानाच्या माध्यमातून सुरु झाली आणि याचा एक डोंबिवलीकर म्हणून कायमच अभिमान वाटतो, असे भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी केले. या संकल्पनेचे श्रेय आबासाहेब पटवारी आणि सुधीर जोगळेकर या भाजपा संघ परिवारातील डोंबिवलीकरांना असल्याचे त्यांनी आवर्जून सांगितले. डोंबिवलीतील नववर्ष स्वागतयात्रेचे यंदाचे २८ वे वर्ष होते.या वर्षीचे खास आकर्षण ठरले ते म्हणजे नेहरू





मैदानात उभारलेली महाकाय दीडशे फुटांची गुढी. विशाल हिंदुत्व आणि भव्य सांस्कृतिक सोहळ्याचे प्रतीक म्हणून ही महाकाय गुढी डौलाने उभारल्याचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी सांगितले.डोंबिवलीतील शोभायात्रेत यावर्षी दोन ठळक गोष्टींनी लोकांचे लक्ष वेधले 'वंदे मातरम' या राष्ट्रगानाचे शतकोत्तरी सुवर्णमहोत्सवी (१५०वे) वर्ष आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शताब्दी (१००वे) वर्ष यावर आधारित डोंबिवलीकर एक सांस्कृतिक परिवाराने २ चित्ररथ साकारले होते. हे चित्ररथ यंदाच्या स्वागतयात्रेचे विशेष आकर्षण ठरले.* यामुळे यंदाच्या स्वागतयात्रेत डोंबिवलीच्या सांस्कृतिक संचितासोबतच राष्ट्रीयत्वाच्या विचारधारेचेही दर्शन घडले. हा दुर्मिळ असा योग आल्याने यंदा डोंबिवलीकर परिवाराने याच राष्ट्रीयत्वाच्या विषयाला अनुसरून चित्ररथ साकारले. वंदे मातरमचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव आणि रास्व संघाच्या पंचसूत्रीवर आधारित चित्ररथाच्या संकल्पनेला अपेक्षेनुसार डोंबिवलीकरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला याचा आनंद असल्याची प्रतिक्रिया भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी दिली.यंदाच्या वर्षी देशभक्तीची अनेक रूपं अशा आशयाची संकल्पना राबवली त्यास डोंबिवलीकरांचा प्रचंड प्रतिसाद लाभला. क्रांतिकारी देशसेवक या संकल्पनेवर आधारित वेशभूषा स्पर्धा झाली. त्यामध्ये ५ वर्षांच्या चिमुकल्यांपासून ७५ वर्षांच्या आजी आजोबांपर्यंत आबालवृद्धांनी सहभाग घेतला. विजेत्यास २५,००० रुपयांची रोख रक्कम देण्यात आले तर उपविजेत्यास १५,००० त्याचबरोबर अन्य पारितोषिके देण्यात आली.

# ग्रामीण महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'महालक्ष्मी सरस २०२६' महत्त्वाचे-मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर

## २४ मार्च ते ०४ एप्रिल वाशी नवी मुंबई येथे महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन २०२६

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

ग्रामीण महिलांच्या कष्टाला योग्य बाजारपेठ मिळवून देत त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महालक्ष्मी सरस विक्री व प्रदर्शन २०२६ हा उपक्रम महत्त्वाचा असल्याचे मत निलेश सागर (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी, उमेद – महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायत राज विभागांतर्गत आयोजित या प्रदर्शनाचा उद्घाटन सोहळा मंगळवार २४ मार्च २०२६ रोजी सिडको प्रदर्शन केंद्र (CIDCO Exhibition Centre) वाशी, नवी मुंबई येथे होणार असून, २४ मार्च ते ०४ एप्रिल २०२६ या कालावधीत हे प्रदर्शन नागरिकांसाठी खुले राहणार आहे. या प्रदर्शनाबद्दल माहिती देण्यासाठी सीबीडी बेलापूर येथील महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान कार्यालयाच्या समिती सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी उमेदचे अतिरिक्त संचालक निखिलकुमार ओसवाल, उपसंचालक (वित्त) बाळासाहेब तट्टू, अवर सचिव धनवंत माळी, उपसंचालक संदिप जठार, उपसंचालक श्वेता पालवे आणि कोकण विभागीय माहिती उपसंचालक मनोज सानप हे उपस्थित होते.उमेदचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर हे माहिती देताना म्हणाले की, 'उमेद' महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून राज्यातील ग्रामीण गरीब कुटुंबांना शाश्वत उपजीविका उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येतो. या अभियानांतर्गत लाखो महिलांना स्वयं-सहाय्यता समूहांमध्ये (SHG) संघटित करण्यात आले असून, त्यांना बचत, कर्ज, आर्थिक साक्षरता आणि उद्योजकता विकासाचे प्रशिक्षण दिले जाते. राज्यातील हजारो गावांमध्ये या अभियानाचा विस्तार झाला असून, महिलांना स्थानिक स्तरावर निर्णयक्षमता आणि आर्थिक स्वावलंबन मिळत आहे.या अभियानाअंतर्गत महिलांसाठी विविध कौशल्य विकास कार्यक्रम राबवले जातात. आर्थिक साक्षरतेसाठी FLACRP प्रशिक्षण, उद्योग उभारणीसाठी मार्गदर्शन, तसेच लघुउद्योग आणि शेतीपूरक व्यवसायांना चालना देण्यात येते. यामुळे महिलांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांच्या कुटुंबांचा आर्थिक स्तर उंचावत आहे. तसेच, बँक कर्ज सुविधा, फिरता निधी (RF) आणि समुदाय गुंतवणूक निधी (CIF) यांच्या माध्यमातून महिलांना व्यवसाय विस्तारासाठी आर्थिक पाठबळ दिले जाते. शेती आधारित उपजीविका, उत्पादक गट (FPO), तसेच कस्टम हायरिंग सेंटरच्या



माध्यमातून ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. उमेद अभियानाच्या माध्यमातून राज्यातील लाखो महिलांना स्वयंसहाय्यता समूहांद्वारे एकत्रित करून त्यांना उद्योजकतेकडे वळवण्यात आले आहे. या महिलांनी तयार केलेल्या दर्जेदार व नाविन्यपूर्ण उत्पादनांना थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्यासाठी या प्रदर्शनाचे दरवर्षी आयोजन करण्यात येते. नवी मुंबईतील हे तिसरे वर्ष असून, नागरिकांकडून या उपक्रमाला दरवर्षी उत्स्फूर्त प्रतिसाद मिळतो.या राज्यस्तरीय प्रदर्शनात एकूण ४९० स्टॉल्स उभारण्यात येणार असून, महाराष्ट्रासह इतर राज्यांतील महिला बचत गट, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि महिला शेतकरी उत्पादक गट (FPO) सहभागी होणार आहेत. याशिवाय विविध शासकीय विभागांचेही स्टॉल्स येथे असणार आहेत. प्रदर्शनातील ७० स्टॉल्सचे भव्य फूड कोर्ट हे प्रमुख आकर्षण ठरणार असून, राज्याच्या विविध भागांतील पारंपरिक चवींचा आस्वाद घेण्याची संधी नागरिकांना मिळणार आहे. तसेच हातमागाचे कापड, लाकडी कलाकुसर, बंजारा व वारली कला, दागिने आणि विविध हस्तकला वस्तू थेट ग्रामीण उत्पादकांकडून खरेदी करता येणार आहेत.यंदा 'व्हिलेज एरिया' संकल्पना, अनामॉर्फिक वॉल, एआर फोटोग्राफी आणि इन्फोग्राफिक वॉल यांसारख्या आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. संपूर्ण प्रदर्शन वातानुकूलित हॉलमध्ये भरवण्यात येणार असून, लहान मुलांसाठी विशेष 'प्ले एरिया'चीही सोय करण्यात आली आहे. अशी माहिती उमेदचे मुख्य कार्यकारी अधिकारी निलेश सागर यांनी दिली. ग्रामीण महिलांच्या उत्पादनांना प्रोत्साहन देण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खरेदी करावी, असे आवाहन निलेश सागर यांनी केले आहे.

# गुड शेफर्ड स्कुल व द सिनियर सिटीझन मँगो गार्डन यांचा महिला दिन संपन्न




**बेलापूर । प्रतिनिधी**

गुड शेफर्ड स्कूल बेलापूर आणि द सीनियर सिटीजन मँगो गार्डन यांच्या संयुक्त विद्यमाने १७ मार्च २०२६ रोजी महिला दिन ग्रँड ५१ हॉटेल येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे श्री सुरेश पोटे फेस्कॉम मुंबई अध्यक्ष आणि शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. लता प्रकाश पोवार तसेच डॉ.रेखा भातखंडे उपाध्यक्ष व उज्ज्वल पाठारे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन करून करण्यात आला. महिला शिक्षक वर्गाने सांस्कृतिक कार्यक्रम केले तर सिनिअर सिटीजन मधील सदस्यांनी गायन सादर केले. फेस्कॉम अध्यक्ष सुरेश पोटे यांनी शिक्षक व ज्येष्ठ नागरिक यांचे कौतुक केले. भोजनाचा आस्वाद घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने गुढीपाडवा उत्सव उत्साहात साजरा

**उरण । प्रतिनिधी**

गुढीपाडवा हा मराठी नववर्षाचा पहिला दिवस (चैत्र शुद्ध प्रतिपदा) असून वसंत ऋतूचे स्वागत करणारा आणि समृद्धीचे प्रतीक असलेला सण आहे. या दिवशी घरोघरी नवीन वस्त्र, कडुनिंब व फुलांनी सजलेले गुढी उभारून पुरणपोळीचा बेत करून आनंदोत्सव साजरा केला जातो. हा हिंदू धर्मातील साडेतीन मुहूर्तापैकी एक महत्त्वाचा मुहूर्त आहे. गुढीपाडवा हा एक भारतीय सण असून तो हिंदू दिनदर्शिका प्रमाणे चैत्रशुद्ध प्रतिपदेला महाराष्ट्रात साजरा करतात शालिवाहन संवत्सराचा हा पहिला दिवस आहे. असा हा पवित्र सण राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वतीने दरवर्षी देशभरात सर्वत्र साजरा केला जातो. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ काही मोजकेच सण साजरे करतो त्यापैकी गुढीपाडवा हा एक सण आहे. उरण शहरातील देऊळवाडीतील श्री संगमेश्वर महादेव देवस्थान येथील श्री शंकराच्या



मंदिरासमोरील मैदानात हा कार्यक्रम मोठा उत्साहात संपन्न झाला. यावेळी ध्वजवंदना , संघ प्रार्थना गीत,त्यानंतर सुभाषित,वचन सांगण्यात आले. श्रीपाद कातरणे यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ देशभरात कोणकोणते कार्य सेवाभावी वृत्तीने करत आहे याची माहिती दिली त्यानंतर सर्वांनी एकमेकांचा परिचय करून घेतला व त्यानंतर कार्यक्रमाचा समारोप झाला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही संघटना राष्ट्रीय त्याचे समाज येथे काम समाजात देशात करत असून राष्ट्राच्या प्रत्येक कार्यात राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे.

# विक्रोळीत हिंदू नववर्ष गुढी पाडवा निमित्त भव्य शोभायात्रा

**मुंबई । प्रतिनिधी**

विक्रोळी-कांजूरमार्ग परिसरात हिंदू नववर्षाच्या निमित्ताने भव्य हिंदू नववर्ष शोभा यात्रा गुरुवार,दि.१९ मार्च २०२६ रोजी कन्नमवार नगरातून काढण्यात आली.या माध्यमातून हिंदू संस्कृतीचे दर्शन घडवतानाच परिसरातील गंभीर पर्यावरणीय समस्यांकडेही नागरिकांचे लक्ष वेधले गेले होते. मठ मंदिर संस्कृती संवर्धन समिती (रजि.) यांच्या वतीने ही शोभा यात्रा काढण्यात आली.चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात वर्ष प्रतिपदा (गुढीपाडवा) हा हिंदू कालगणनेनुसार नववर्षाचा पहिला व अत्यंत पवित्र दिवस मानला जातो. धार्मिक दृष्ट्या हा दिवस साडेतीन मुहूर्तांपैकी एक मानला जात असल्याने त्याला विशेष महत्त्व आहे. या शोभायात्रेत ढोल-ताशा पथक, पारंपरिक वेशभूषा परिधान करुन नागरिक सामील झाले होते.तसेच विविध सांस्कृतिक सादरीकरणे




यांसारखी आकर्षणे या यात्रेत होती.गेल्या १८ वर्षांपासून नगरात हिंदू नववर्ष शोभा यात्रा आयोजित केली जात आहे. यावर्षी वंदे मातरम् या अमृतमय जयघोषाद्वारे राष्ट्रप्रेमाची भावना जागविणाऱ्या ऐतिहासिक आंदोलनाची आठवण करून दिली. यंदा राष्ट्रगीताला दीडशे वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रप्रेमाने ओथंबलेले गीतांचे भव्य व प्रभावी चित्ररथ सादरीकरण केले होते.तसेच बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या मराठी अस्मिता, हिंदुत्व आणि तिरंगी राष्ट्रनिष्ठेच्या विचारांना अधोरेखित करणारे विशेष चित्ररथही शोभा यात्रेत सामील होता.याशिवाय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'पंच परिवर्तन' या कालसुसंगत संकल्पनेवर आधारित समाजप्रबोधन, राष्ट्रचेतना आणि संस्कारांची जोपासना करणारे प्रेरणादायी चित्ररथ सादर करण्यात आला होता. शोभा यात्रेत समितीचे अध्यक्ष सुरेश सरनोबत,आमदार मिहीर कोटेजा, माजी आमदार मंगेश सांगळे,नगरसेविका सुनिता चंद्रशेखर जाधव, शिवसेना उबाठा विभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव, ज्येष्ठ पत्रकार नासिकेत पानसरे,ड.ज्योती दुराफे,वासुदेव कदम, औंदुबर सराफ,वंदना बेंद्रे आदि मान्यवर सामिल झाले होते.दरम्यान, समितीने कांजूरमार्ग डम्पिंग ग्राउंडमुळे परिसरातील नागरिकांना भेडसावणाऱ्या आरोग्याच्या गंभीर समस्येकडेही लक्ष वेधले होते.शोभा यात्रेत ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळाचे भजन मंडळ तसेच ग्राहक पंचायत महाराष्ट्र मुंबई उपनगर कुर्ला तालुक्याच्या वतीने ग्राहकांच्या जनजागृतीसाठी पत्रके वाटण्यात आली.शोभा यात्रा यशस्वी करण्यासाठी समितीचे अध्यक्ष सुरेश सरनोबत,प्रकाश बाबर,विलास पारकर, निरंजन यजमाल,श्रीनिवास तल्ला,राहुल वाघधरे,दिनेश बैरीशेट्टी,केतकी सांगळे,शंकर ऊर्फ नाना ढमाले,विश्वनाथ सावंत, अभय राणे,प्रकाश पुजारे,महेंद्र खोत,सुरेश वंगा,सीए निखील मंडलेचा बरीच मेहनत घेतली होती.

# सशक्त महिला, सक्षम समाजासाठी कटिबद्ध–सौ.ममताताई प्रितम म्हात्रे

**पनवेल । प्रतिनिधी**

पनवेल महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक १८ मधील कार्यक्षम, लोकाभिमुख व विकासाभिमुख नगरसेविका सौ. ममताताई प्रितम म्हात्रे यांची महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या सातत्यपूर्ण सामाजिक कार्याची दखल घेत भारतीय जनता पक्षाच्या नेतृत्वाकडून ही महत्त्वपूर्ण जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.सौ. ममता प्रितम म्हात्रे या २०१० पासून सामाजिक कार्यात सक्रिय असून २०२५ मध्ये त्यांनी राजकारणात पदार्पण केले. फॅशन डिझायनिंगचे शिक्षण घेतलेल्या सौ. म्हात्रे या प्रभाग क्रमांक १८ मध्ये एक संवेदनशील, तत्पर आणि उत्तरदायी लोकप्रतिनिधी म्हणून ओळखल्या जातात. राजकारणापेक्षा समाजकारण या विचारसरणीवर विश्वास ठेवत त्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून त्यावर तातडीने उपाययोजना करण्याची कार्यपद्धती जपली आहे. मा.खासदार श्री. रामशेठ ठाकूर आणि मा. नगराध्यक्ष श्री.जे.एम. म्हात्रे यांचे आशीर्वाद तसेच आमदार श्री.प्रशांत ठाकूर , मा.विरोधीपक्ष नेते श्री. प्रितम जनार्दन म्हात्रे यांचे मार्गदर्शनपर नेतृत्व यामुळेच त्यांच्या कार्याला दिशा व बळ मिळाले असून, या सर्व वरिष्ठांच्या प्रेरणेतूनच त्यांची महिला व बालकल्याण समिती सभापतीपदी निवड झाल्याचे मानले जात आहे. भारतीय जनता पक्षाच्या सबका साथ, सबका विकास, सबका विश्वास या मूलमंत्रानुसार त्यांनी आपल्या कार्यात




**मा. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस ,भाजपा प्रदेशाध्यक्ष श्री.रवींद्रजी चव्हाण आणि भाजपा महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष सौ.चित्राताई वाघ यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पक्षाच्या महिला सक्षमीकरण, आरोग्य व रोजगारविषयक धोरणांना अधिक प्रभावीपणे तळागाळापर्यंत पोहोचविण्याचा मी दृढ संकल्प करते. मिळालेल्या या जबाबदारीचे संधीमध्ये रूपांतर करून शासनाच्या प्रत्येक योजनेचा लाभ समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवून सकारात्मक आणि परिणामकारक काम करण्याचा माझा निर्धार आहे. –**

**सौ.ममताताई प्रितम म्हात्रे.सभापती, महिला–बालकल्याण समिती ,पनवेल महानगरपालिका**

सर्वसमावेशक विकास, पारदर्शकता, सेवा भाव व जनहित या नीतिमूल्यांना प्राधान्य दिले आहे. महिला सक्षमीकरणाच्या क्षेत्रात त्यांनी गेली १५ वर्षे सातत्याने काम करत १००% महिलांच्या व्यापारी–ग्राहक पेठांचे आयोजन, महिला बचतगटांना आर्थिक व प्रशिक्षण सहाय्य, तसेच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. भारतीय जनता पक्षाचा सशक्त महिला – सक्षम समाज हा संदेश त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून साकारला आहे.

आरोग्य सेवेत त्यांनी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे, महिलांसाठी थायरॉईड व व्ह–१३ तपासण्या, चष्मा वाटप, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, औषध वितरण यांसारख्या उपक्रमांद्वारे हजारो नागरिकांना दिलासा दिला आहे. प्रतिबंध हाच सर्वोत्तम उपचार या संकल्पनेला त्यांनी प्राधान्य दिले आहे.रोजगार निर्मिती व युवक सक्षमीकरणासाठी त्यांनी रायगड व नवी मुंबई परिसरात १०,००० हून अधिक कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देण्यात योगदान दिले आहे. कौशल्य विकास प्रशिक्षण, उद्योग क्षेत्राशी समन्वय व विशेषतः दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ संदर्भात युवकांना मार्गदर्शन शिबिरांच्या माध्यमातून रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या आहेत.

शिक्षण व क्रीडा क्षेत्रात त्यांनी आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारून, गुणवत्तापूर्ण शिक्षण, सांस्कृतिक व क्रीडा उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधला आहे.नैसर्गिक आपत्तीच्या काळातही त्यांनी संवेदनशील नेतृत्व करत पूरग्रस्त, आपत्तीग्रस्त कुटुंबांना अन्न, निवारा व जीवनावश्यक साहित्य उपलब्ध करून दिले. धाराशिव, इरशाळवाडी, महाड महापूर, निसर्ग व तौक्ते चक्रीवादळ अशा विविध प्रसंगी त्यांनी मदतीचा हात दिला आहे. आध्यात्मिक व सेवाभावी कार्यातही त्यांनी श्री क्षेत्र पंचायतन मंदिर, नढाळ (चौक) येथे भाविकांसाठी निवास, अन्नप्रसाद, मोफत सेवा तसेच शिक्षण व सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून सेवा हीच साधना हा विचार रुजविला आहे.महिला व बालकल्याण क्षेत्रातील त्यांच्या व्यापक अनुभवाचा व उल्लेखनीय कार्याचा विचार करूनच त्यांची सभापतीपदी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे महिला व बालकल्याण विभागाच्या कामकाजाला अधिक गती मिळून समाजातील दुर्बल घटकांना अधिक सक्षम आधार मिळेल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.या निवडीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत असून, त्यांनी भविष्यातही समाजहिताच्या विविध उपक्रमांद्वारे पनवेल शहराच्या सर्वांगीण विकासात मोलाचे योगदान देत राहावे, अशा शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# वाहतूक नियमांची ऐंशी की तैशी याला जबाबदार कोण–वाहतूक विभागाचे दूर्लक्ष

**पुणे । रमेश जयस्वाल**

वाहने विरूध्द दिशेने येतात / ओव्हर लोड जड ,टेम्पो वाहनांवर कारवाईचं नाही / कमी वयाचे मूले वाहने चालवतात / दोन चाकी वाहनांवर तीन तीन व्यक्तिंचा प्रवास/ वाहतूक पोलिसांची बघ्याची भुमीका

शहरासह उपनगरातील वाहतूकीचा बोजवारा उडत आहे एकतर दिलेल्या ठिकाणी वाहतूक पोलिस हजारचं नसतात आणि हजर असले तरी यांना वाहतूकीचे काहीही घेणे देणे नाही चार पाच सावज शोधायचे आणि आपले आर्थिक गणीत जूळवायचे हाच प्रकार सर्वचं ठिकाणी सुरू आहे काही ठिकाणी एखाद्याला पकडले तर वाहतूक पोलिस दंड जास्त मागतात आणि शेवटी कमी नगदी तोडी करून आपण न घेता ठरलेल्या ठिकाणी पान टपरी ,जवळचे दूकान या ठिकाणी नगदी देण्याचा हा एक नवीन फंडा पुढे येत आहे पत्रकारांनी जर विचारले की आपण दिलेल्या ठिकाणी हजर का राहत नाही या पत्रकारांना सूध्दा अपमानित केल्याचा प्रकार केला जात आहे याला ऐकचं कारण आहे वरिष्ठांचे यांच्यावर अंकूश नाही राजकिय आश्रयाखाली वाहतूक पोलिस वावरतांना दिसत वाटेल तसे वागा कधीही या आणि कसाही वापर करत कधीही निघण्याचा प्रकार या वाहतूक पोलिसांचा थांबविणार कोण ? सर्वांचे हात बरबटलेले आहे पोलिस आयूक्त अमितेश कूमार यांनी वाहतूक पोलिसांना अनेक निर्देश दिले असले तरी याचे पालनचं होत नाही हडपसर,लोणी काळभोर,पाषाण, औंध, शिवाजीनगर, कात्रज,




सिंहगड,कोथरूड,बालेवाडी, बाणेर ,वावधन सुस, ताथवडे कशा अनेक ठिकाणी वाहतूक पोलिस दिलेल्या ठिकाणी हजरचं राहत नाही यामुळे विरूध्द दिशेने अनेक ठिकाणी वाहतूक करत आहे नियमा विरोधात जास्त प्रवाशी,ओव्हर लोड वाहने,वाहतूक नियम तोडण्याचा प्रकार रोजचं घडत आहे तोंडी पाणी करण्याचा प्रकारही वाढत आहे कोणालाही कोणाचाही धाक राहिलेला नाही वाटेल तसे वागा असा प्रकार वाहतूक पोलिसा कडून शहर आणि उपनगरात सूरू आहे यात चतू:श्रृगी, बाणेर,शिवाजीनगर,हडपसर ,लोणी काळभोर कोथरूड,वारजे माळेवाडी येथिल वाहतुक पोलिसांचे निष्क्रियता दिसून येत आहे या वाहतूक पोलिसांवर योग्य ती कारवाईची मागणी केली जात आहे

( हडपसर,चंदननगर,वाघोली,कात्रज, स्वारगेट,वारजे माळवाडी, सिंहगड,लोणी काळभोर ,कोथरूड ,वावधन येथिल वाहतूक विभागाचे अर्थकारण पुढील भागात )

# डंपर,सिमेंट मिक्सर,जड वाहने ठरतात मृत्यूचे सापळे!

**पुणे । रमेश जयस्वाल**

पुणे शहरातील आणि उपनगरात एक भीषण वास्तव्य समोर येत आहे शहरातील रस्ते जनतेसाठी सुरक्षित राहिलेले नाही रोज या जड वाहनांमुळे अनेकांचा बळी जात आहे यात डंपर,सिमेंट मिक्सर,आर एमसीए ट्रक, टॅंकर,जड मालवाहू वाहने या वाहनांचे राजेरोस वावर आणि भरधाव वेगाने धावणारे वाहनामुळे नागरिक चिरडल्या जात आहे अनेक ठिकाणी या वाहनांना काही काळ बंदी असतांनाही कोणाच्या भरवश्यावर हे वाहने शहरभर बेधडकपणे धावतांना दिसतात शहरात आणि उपनगरात अलिकडच्या काळात अनेक घटनांनी ही परिस्थिती रोजचं गंभीर होत चालली आहे जेष्ठ नागरिक,शाळेत जाणारे मुलं,घरातील कमावता व्यक्ती या अपघातात बळी जात आहे हा प्रकार कधी थांबनार ? या



वाहनांच्या हालचालींवर ,नो एंट्रीमध्ये घूसणे ,वेग मर्यादा तोडणे,वाहतूकीचे नियम पायदळी तूडवणे अशा वाहनांवर वाहतूक विभागाचे प्रभावी नियंत्रण नाही असे वाहने शहरात काही काळ बंदी असतांनाही आर्थिक देवानघेवानाच्या कारणाने हे वाहने नियमा विरोधात धावत आहे हडपसर,लोणी काळभोर, बाणेर ,बालेवाडी,सुस,पाषाण, औंध,चतू:श्रृंगी ,शिवाजीनगर , सिंहगड,कोथरूड या विभागात भरधाव वेगाने हे वाहने सकाळ पासून रात्रभर रोडवर धावतात आर्थिक देवानं घेवाण कारणाने जनता भरडली जात आहे बाणेर, बालेवाडी,औंध विभागात खडी,वाळू,किंवा सिमेंटने भरलेले ट्रक २० ते ३० टन ओव्हर लोड वाहतात आतातर ही वाहने थेट शाळांच्या रस्त्यावर,भर निवडावी भागात,गर्दीच्या ठिकाणी दिवसाला शेकडो ट्रक रस्त्यावरून धावतात या विभागात वाढणारे बांधकाम यांचे वाहने बंदी काळात रोडवर धावतात ही वाहने या विभागातील अंतर्गत रस्त्यांवर धावत आहे वाहतूक विभागाचे नियंत्रण नसल्याने जनतेचा जिवाशी खेळण्याचा प्रकार केला जात आहे या वाहनांवर वाहतूक विभागाने वाहतूक नियमांचे अंमलबजावणी करावी जनते कडून मागणी केली जात आहे .

# गुढीपाडवा निमित्त शिवसेनेच्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी घेतली जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर यांची सदिच्छा भेट

**उरण । प्रतिनिधी**

गुढीपाडवा सणाचे तसेच नववर्षाचे औचित्य साधून उरण मधील शिवसैनिकांनी, पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी शिवसेना रायगड जिल्हा प्रमुख तथा माजी आमदार मनोहर शेठ भोईर यांच्या कार्यालयात जाऊन त्यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे शुभाशीर्वाद घेतले. यावेळी उरण शहर प्रमुख विनोद म्हात्रे,माजी नगराध्यक्ष परमानंद करंगुटकर,माजी शहर प्रमुख निरंतर कदम,माजी पंचायत समिती सदस्य हिराजी घरत, शिवा म्हात्रे,कार्यालय प्रमुख राजेश निकम आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.गुढीपाडव्याच्या व नव वर्षाच्या यावेळी एकमेकांना शुभेच्छा देण्यात आले.



# महाराष्ट्राच्या भूमीवर प्रथमच 'कर्वी ग्लॅमर'चा भव्य सोहळा मिस्टर-मिस-मिसेस इंडिया प्लस साईज ब्युटी पेजंट २०२६ (सीझन २) चा ग्रँड फिनाले संपन्न

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या भूमीवर प्रथमच देशातील सर्वात मोठा आणि अनोखा मिस्टर, मिस आणि मिसेस इंडिया प्लस साईज ब्युटी पेजंट फॅशन शो २०२६ (सीझन २) चा भव्य सोहळा १७ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आला. देशभरातून आलेल्या स्पर्धकांनी या मंचावर आत्मविश्वास आणि प्रतिभेचे उत्कृष्ट प्रदर्शन केले. हा कार्यक्रम कर्वी ग्लॅमर इव्हेंट अंतर्गत आयोजित करण्यात आला होता. याची प्रमुख आयोजक व मेघना चॅरिटेबल ट्रस्टच्या संस्थापक समाजसुधारक मेघना शेंडगे यांनी हा सोहळा बॉलिवूड स्टाईलमध्ये सादर केला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश सौंदर्याला आत्मविश्वासासह साजरे करणे आणि प्रत्येक व्यक्तीमध्ये स्वतःची ओळख निर्माण करण्याची क्षमता आहे हा संदेश देणे हा होता. आजच्या धावपळीच्या जीवनात अनेक जण आपली स्वप्ने दाबून स्वतःला कमी समजू लागतात. त्यामुळे बॉडी शेमिंगविरुद्ध बॉडी पॉझिटिव्हिटी आणि प्रेरणेचा संदेश देण्यासाठी या मंचाची सुरुवात करण्यात आली आहे. सीझन २ मध्ये देशभरातून मोठ्या संख्येने स्पर्धक सहभागी झाले होते. या कार्यक्रमात दै. मुंबई हलचलचे संपादक दिलशाद एस. खान यांचा विशेष सन्मान करण्यात आला. स्पर्धेतील विजेते पुढीलप्रमाणे आहेत : मिसेस इंडिया मॉडेल किताब अर्पिता ठाकूर कोठारी (आर्किटेक्ट) यांनी जिंकला. प्रथम रनर-अप मोनिका तिवारी (शिक्षिका) आणि द्वितीय रनर-अप दीपालीवसंत (फायनान्शियल ॲडव्हायझर) ठरल्या. मिस्टर इंडिया मॉडेल किताब पुष्पक पाटील (कॉमेडी कलाकार) यांनी पटकावला. प्रथम रनर-अप अरविंद कुमार सिन्हा (कंट्री क्लब मॅनेजर) आणि द्वितीय रनर अप पंकज शर्मा (फिटनेस ट्रेनर) राहिले. तसेच मिस इंडिया मॉडेल किताब सई शेंडगे (हिप-हॉप डान्सर) यांनी जिंकला. प्रथम रनर-अप विभूषा कांदळकर (लावणी नृत्यांगना) ठरल्या. सबटायटल विजेत्यांमध्ये सरिता गुप्ता यांना फोटोजेनिक फेस, रीना सोबती यांना इंटेलेक्च्युअल



आयकॉन, अश्विनी जोशी यांना कॉनजेनियलिटी आयकॉन आणि रेश्मी मुन्सी यांना कॉन्फिडेंटल क्वीन हा किताब देण्यात आला. विजेत्यांना कर्वी ग्लॅमरकडून आकर्षक क्राउन, सॅश, ट्रॉफी, सर्टिफिकेट आणि खास भेटवस्तू देण्यात आल्या. यामध्ये आर के गोल्डकडून १ ग्रॅम सोन्याची चेन देखील देण्यात आली. गिफ्ट पार्टनर कपिल सिंह आणि क्राउन पार्टनर समीर मेहता होते. सर्व स्पर्धकांनी तीन दिवसांच्या विशेष प्रशिक्षणामध्ये कठोर परिश्रम केले आणि त्याच मेहनतीमुळे त्यांनी हे यश संपादन केले. कार्यक्रमाच्या आयोजन समितीत मॅनेजिंग डायरेक्टर भारत शेंडगे, इन्क्युरमेंट मॅनेजर रेनाल्डो रोजारियो, सेलिब्रिटी ग्रूमर प्रशांत जाधव, मेकअप पार्टनर लेक्मे मालाड वेस्ट, कॉस्च्युम डिझायनर रिया जरसानिया, सतीश नाशित आणि झिनल खान, तसेच बिग सपोर्टिंग पार्टनर नेविल करवाना (नेकझेड एंटरप्रायझेस) आणि प्रेझेंट्स विशिक (राहुल शर्मा) यांचा समावेश होता. या भव्य कार्यक्रमाला महाराष्ट्र सरकारचे मंत्री आशीष शेलार, मुख्यमंत्री यांच्या पत्नी आणि गायिका अमृता फडणवीस, माजी मंत्री व आमदार असलम शेख,सुप्रसिद्ध अभिनेत्री ईशा देओल, अभिनेते गोविंदा तसेच My Friend Ganesha या चित्रपटाचे दिग्दर्शक राजीव रुइया यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनी स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व सहकारी आणि स्पर्धकांनी दिलेल्या योगदानाबद्दल आयोजकांनी सर्वांचे मनापासून आभार मानले.

# सोनखार–पामबीचमध्ये 'संयुक्त कुटुंब' संकल्पगुढी; ढोलताशा–लेझीम,महाराष्ट्रीयन पोशाखातील रॅम्प वॉकने नववर्षाचा उत्सव रंगला

**नवी मुंबई । प्रतिनिधी**

गुढीपाडव्याच्या निमित्ताने सोनखार–पामबीच परिसरात हिंदू नववर्षाचे पारंपरिक आणि उत्साही वातावरणात स्वागत करण्यात आले. सानपाडा सेक्टर १६ येथील गुनीना मैदानावर उपमहापौर दशरथ भगत यांच्या हस्ते सपत्नीक गुढी उभारण्यात आली. 'संयुक्त कुटुंब'चा संदेश देणाऱ्या या उपक्रमातून जागतिक शांततेची प्रार्थनाही व्यक्त करण्यात आली.सकाळी लवकरपासूनच नागरिकांनी मैदानावर मोठ्या संख्येने हजेरी लावली. मंत्रोच्चारात गुढी उभारल्यानंतर सामूहिकरित्या पसायदान गायले गेले. त्यानंतर सुरू झालेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी वातावरणात चैतन्य निर्माण केले.ढोलताशा पथकांच्या दमदार गजराने कार्यक्रमाची सुरुवात झाली. तालबद्ध ठेक्यावर तरुणाईने उत्स्फूर्त प्रतिसाद देत मैदान दणाणून सोडले. यानंतर महिलांच्या लेझीम पथकाने सादर केलेल्या देखण्या हालचालींनी उपस्थितांची मने जिंकली.





पारंपरिक पोशाखातील महिलांनी सुसंगत तालावर केलेले लेझीम सादरीकरण हे विशेष आकर्षण ठरले. त्याचबरोबर शिवकालीन परंपरेची आठवण करून देणाऱ्या मर्दानी खेळांच्या प्रात्यक्षिकांनी कार्यक्रमात ऐतिहासिक रंग भरला.उत्सवात लहान मुलं, तरुण आणि महिलांनी संत, महापुरुष तसेच विविध पारंपरिक वेशभूषा परिधान करून सहभाग घेतला. विशेषतः लहान मुलांच्या पारंपरिक वेशभूषेतील रॅम्प वॉकने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. आत्मविश्वासपूर्ण सादरीकरण, आकर्षक पोशाख आणि टाळ्यांच्या कडकडाटात रंगलेला हा रॅम्प वॉक कार्यक्रमातील ठळक क्षण ठरला.याशिवाय मैदानावर शिवकालीन मर्दानी खेळांच्या प्रात्यक्षिकांनी आणि महिलांच्या लेझीम सादरीकरणाने नागरिकांची मनं जिंकली, तर सोहळ्यास्थळी साकारण्यात आलेल्या भव्य रांगोळी ने भारतीय संस्कृतीचे दर्शन घडविले. पारंपरिक वेशभूषा करणाऱ्या महिला, पुरुष आणि बालकांचा आयोजकांच्या वतीने रोख रक्कम, भेटवस्तू व गिफ्ट व्हाऊचर्स देऊन सन्मान करण्यात आला.या उपक्रमाचे आयोजन नगरसेवक निशांत करसन भगत, नगरसेविका प्रीती संदीप भगत व समाजसेवक संदीप करसन भगत यांच्या संयोजनाखाली करण्यात आले. विविध सामाजिक व सांस्कृतिक संस्थांच्या सहकार्यामुळे कार्यक्रम यशस्वी ठरला. 'संयुक्त कुटुंब' ही संकल्पना समाजात रुजवण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात येत असल्याचे उपमहापौर दशरथ भगत यांनी नमूद केले. आखाती देशात सुरु असलेल्या युद्धामुळे त्या–त्या देशांचे मानव, साधन संसाधन व वैश्विक शांततेचे नुकसान होत आहे, 'वसुदेव कुटुंबकम' ही भारतीयांची शिकवण जगासाठी अनुकरणीय आहे अशी भावना उपमहापौर भगत यांनी व्यक्त केली.उपक्रमाच्या कार्यवाहक माजी नगरसेविका श्रीमती. फशीबाई करसन भगत, सौ.वैजयंती दशरथ भगत, सौ. रुपाली निशांत भगत यांच्या सह कार्यक्रमास ड प्रभाग समिती अध्यक्षा शैला जगदीश पाटील, नगरसेविका शिल्पा राजेश ठाकूर, नगरसेवक भाऊ भापकर, परिवहन समिती सदस्य राजेश राय हे उपस्थित होते. उपक्रम यशस्वी करण्यास सोनखार (पामबीच ) जेष्ठ नागरिक सेवा समितीचे सदस्य व सोनखार कराओके कला मंच यांचे विशेष सहकार्य लाभले.दरम्यान, शिवकालीन मर्दानी खेळ, ढोलताशांचा गजर, महिलांचे लेझीम आणि अस्सल महाराष्ट्रीयन संस्कृतीतील पेहरावातील रॅम्प वॉक यामुळे गुढीपाडव्याचा उत्सव यंदा विशेष रंगतदार ठरला असून परिसरात नववर्षाचा उत्साह शिगेला पोहोचला आहे.

# ठाण्यात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली नववर्ष स्वागत यात्रा

**संतोष पडवळ । ठाणे**

ठाणे महानगरपालिका आणि कोकणेश्वर सांस्कृतिक न्यास यांच्या संयुक्त विद्यमाने आज ठाणे शहरात नववर्ष स्वागत यात्रा मोठ्या उत्साहात काढण्यात आली. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सकाळी सात वाजता कोपिनेश्वर मंदिरात पालखीचे विधिवत पूजा केल्यानंतर या यात्रेला प्रारंभ करण्यात आला. यावेळी स्वागतयात्रेच्या स्वागताध्यक्ष डॉ.धनश्री लेले उपस्थित होत्या. या शोभायात्रेत परिवहन मंत्री प्रताप सरनाईक खासदार नरेश म्हस्के, आमदार संजय केळकर निरंजन डावखरे, महापौर शर्मिला पिंपळकर, महापालिका आयुक्त सौरभराव उपमहापौर कृष्णा पाटील, सभागृह नेते हणमंत जगदाळे, अतिरिक्त आयुक्त १ संदीप माळवी अतिरिक्त आयुक्त २ प्रशांत रोडे यांच्यासह नगरसेवक पवन कदम, संजय वाघुले, नारायण पवार, मृणाल



पेंडसे, नम्रता कोळी, माधुरी मेटांगे आदी सहभागी झाले होते. तसेच कोपिनेश्वर सांस्कृतिक चे पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

विविध लोककलांचे सादरीकरण, सामाजिक संदेश देत जनप्रबोधन करणारे नाविन्यपूर्ण चित्ररथ, ढोल – ताशांचा गजर,एरियल सिल्क, मल्लखांब, जिमनॅस्टिकची चित्तथरारक प्रात्यक्षिके, पारंपरिक वेशभूषेतील सायकल रॅली, विविध संस्थांची पदयात्रा,महिलांची बाईक रॅली आदींचा समावेश या स्वागत यात्रेत होता. पारंपरिक वेशभूषा करत सहभागी झालेले नागरिकांच्या अभूतपूर्व गर्दीत , रांगोळीच्या पायघड्यावरून पालखी जांभळी नाक्यावरून दगडी शाळेजवळ आल्यावर चित्ररथ यात्रेत सहभागी झाले. दरम्यान चिंतामणी चौक, हरिनिवास सर्कल,गोखले रोड या तीन ठिकाणी पालखीवर पुष्पवृष्टी झाली. यंदा पहिल्यांदाच तृतीयपंथी समाजाचा लक्षणीय सहभाग होता. त्यांनी समानतेचा संदेश दिला. कर्नाटक सांस्कृतिक मंचने आपल्या सादरीकरणातून संस्कृतीचे दर्शन घडवले. भगिनी निवेदिता यांचा पर्यावरणाचा संदेश देणाराचित्ररथ,टीजेएसबी बँक यांचे चित्ररथ आकर्षण बिंदू ठरले. वनवासी कल्याण आश्रम यांनी तारपा नृत्य सादर केले. येऊर येथील एकलव्य क्रीडा मंडळ यांचा वारकरी आणि धारकरी यांचा संगम असलेले सादरीकरण केले. मन:शक्ती केंद्राचे वैचारिक प्रदूषण, तृतीयपंथी यांची इलेक्ट्रीक गुलाबी रिक्षा,ठाणे नेत्ररोगतज्ञ असोसिएशन यांचा काचबिंदू विषयी जनजागृती करणारा चित्ररथ असे नाविन्यपूर्ण विषयांचे सादरीकरण स्वागतयात्रेत दिसून आले. तीन पेट्रोल पंप जवळ एरियल सिल्क, हरी निवास सर्कल कबड्डी प्रात्यक्षिके , मल्हार चौकात, गोखले रोड,पू न गाडगीळ चौक जिमनॅस्टिक सादरीकरण झाले.

दैनिक लोकांकीत हे वृत्तपत्र मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक संजय त्रिंबक पवार यांनी पार्थ प्रिंटींग प्रेस, कर्नाळा भवन, ४५/६१, सहकारी भात गिरणी कंपाऊंड मार्केट यार्ड, पनवेल, जि. रायगड पिन ४१०२०६ येथे छापून मुख्य कार्यालय,शॉप नं.१२४, दत्त मंदिर चाळ, कोंकण नगर, नवजिवन सोसा. समोर, रामकृष्ण चेंबूरकर मार्ग, चेंबूर, मुंबई पिन.७८ पनवेल कार्यालय,साई शरण को–ऑप. ही. सोसायटी, प्लॉट नं. ५०, ऑफीस नं. १४, सेक्टर ८, खांदा कॉलनी, नवीन पनवेल ४१० २०६ येथून प्रकाशित केले. मो. ९३२१५८५३६५ गोरख रामदास सुर्यवंशी (कार्यकारी संपादक)